असा. क्र. १३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, एप्रिल १७, २००६/चैत्र २७, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.**—महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . | ९८-१०० |

दिनांक १५ एप्रिल २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**

सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १७ एप्रिल २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;



[**किंमत :** रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २००६ रोजी महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अध्यादेश, २००६, हा प्रख्यापित केला होता ;

१९६१ चा महा. २७.

२००६ चा महा. अध्या. ३.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १७ फेब्रुवारी २००६ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २८-१अअ मधील, पोट-कलम (३) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

१९६१ चा महा. २७.

" परंतु तसेच, ज्या व्यक्तीने महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केला नव्हता किंवा ज्या व्यक्तीने उक्त कालावधीनंतर अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, अशा व्यक्तीने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास, ती व्यक्ती अशी जमीन परत मिळण्यास पात्र होईल. ".

२००३ चा महा. १७.

२००६ चा महा. ८.

**३.** (१) महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अध्यादेश, २००६,

२००६ चा महा. अध्या. ३. हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ३२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, एप्रिल १७, २००६/चैत्र २७, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2006 (Mah. VIII of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VIII OF 2006.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 17th April 2006.).*

An Act further to amend the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him
Mah. XXVII of 1961. to take immediate action further to amend the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated
Mah. Ord. III of 2006. the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Ordinance, 2006, on the 17th February 2006 ;

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2006.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 17th February 2006.

Amendment of section 28-1AA of Mah. XXVII of 1961.

**2.** In section 28-1AA of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 (hereinafter referred to as " the principal Act "), in sub-section (*3*), after the second proviso, the following proviso shall be added, namely :— Mah. XXVII of 1961.

" Provided also that, a person who had not applied for grant of such land within the period of 90 days from the date of commencement of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2001, or who has applied for grant of such land after the said period, shall be eligible for grant of such land if he applies for grant of such land within a period of 90 days from the date of commencement of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2006.". Mah. XVII of 2003. Mah. VIII of 2006.

Repeal of Mah. Ord. III of 2006 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Ordinance, 2006, is hereby repealed. Mah. Ord. III of 2006.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, or taken, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई